**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

सन्माननीय सदस्या श्रीमती नमिता मुंदडा यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन

**उपाध्यक्ष :** आज शुक्रवार, दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सन्माननीय सदस्या श्रीमती नमिता मुंदडा यांचा वाढदिवस आहे. सदनाचे कामकाज सुरु होण्यापूर्वी त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात येत आहेत.

-------

असुधारित प्रत

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये ओबीसींना राजकीय आरक्षण मिळण्याबाबत**

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, एकीकडे माननीय मंत्री श्री. नवाब मलिक यांच्या संदर्भात आम्ही सातत्याने मुद्दा लावून धरला. मात्र राज्य सरकारने अद्यापही त्यांचा राजीनामा घेतलेला नाही. काल सर्वोच्च न्यायालयामध्ये राज्यातील ओबीसींचे राजकीय आरक्षण पूर्णपणे संपले आहे. या संबंधी अक्षरश: राज्य शासनाचे हसे झाले आहे. दि. १३.१२.२०१९ रोजी राज्य शासनाला डेडिकेटेड कमिशन तयार करुन ओबीसींचा इम्पेरिकल डेटा जमा करण्यास सांगितले होते. दि. १३.१२.२०१९ पासून काल पर्यंत जवळजवळ दोन ते सव्वा दोन वर्षे निघून गेले. मात्र एक पैशाचे देखील काम राज्य शासनाने केलेले नाही. सर्वोच्च न्यायालयाने आपल्याला इंटेरिम रिपोर्ट देण्याची संधी दिली. आपण जो इंटेरिम रिपोर्ट दिला तो म्हणजे एकप्रकारची थट्टा आहे. काल तेथील न्यायमूर्तींनी विचारले की, अंतरिम अहवाल कशाच्या आधारे तयार केला तर आपल्या वकिलांना हे सांगता आले नाही. त्यांनी सांगितले की, आम्ही हा रिपोर्ट मुख्यमंत्री महोदयांकडे सोपवला. त्यावेळी न्यायालयाने विचारले की, अहवाल ऑथेंटीक होतो काय, त्यावर कोणतेही उत्तर देऊ शकले नाही. ही शासकीय कामकाजाची पद्धत आहे का, असे त्यांनी विचारले. या अहवालावर साधी तारीख नव्हती, सह्या नव्हत्या. माननीय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांनी विचारले की, अशा प्रकारची कामकाजाची पद्धत असते काय ? या अहवालावर डेटा कधी गोळा केला याची माहिती नाही, डेटा कोठून गोळा केला याची माहिती नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, राजकीय मागासलेपणा संबंधीचा डेटा. मात्र त्याचा उल्लेख कोठेही या अहवालात करण्यात आलेला नाही. यावर न्यायालयाने विचारले की, मागील वेळी हीच आकडेवारी तुम्ही नाकारली होती. आता तीच तुम्ही ग्राह्य धरणार आहात. असे नवीन काय घडले आहे, त्यासाठी तुम्ही वेगळा रिसर्च केलेला आहे काय ? यावर असे सांगण्यात आले की, कोणताही रिसर्च केलेला नाही.

असुधारित प्रत

श्री. देवेंद्र फडणवीस .....

अध्यक्ष महोदय, आमच्या आटपाडी येथील १० गावांनी ५ दिवसांमध्ये स्वत: इम्पेरिकल डेटा जमा करुन जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला व हे दाखवून दिले की, केवळ ५ दिवसांमध्ये हा डेटा जमा होऊ शकतो. यामध्ये अपेक्षित हे आहे की, आरक्षण नसेल तर ओबीसींना योग्य संधी मिळणार नाही, याचे जस्टीफिकेशन यामध्ये देणे आवश्यक आहे. जर आरक्षण नसेल तर ओबीसींना योग्य प्रकारे प्रतिनिधीत्व मिळणार नाही. या बाबत अवाक्षरही या संपूर्ण अहवालात नाही.खरे म्हणजे हे डेडीकेटेड कमिशन आहे. हे स्वतंत्रपणे काम करणारे कमिशन आहे. मात्र न्यायालयाने सांगितले की, कमिटीच्या बैठकीला माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, ओबीसी विभागाचे माननीय मंत्री... त्यांनी हे विचारले की, हे स्वतंत्र कसे ? तर त्याचेही उत्तर आपण देऊ शकलेलो नाही.

यानंतर श्रीमती गिरप.....

अस्सुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस ...

त्यामुळे कुठे तरी या संदर्भात राज्य सरकारची कमिटमेंट आहे काय, हाच सवाल निर्माण होत आहे. अध्यक्ष महोदय आपण माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ साहेबांना विचारा त्यांनी जेव्हा-जेव्हा आम्हाला सांगितले तेव्हा-तेव्हा आम्ही सहकार्याचीच भूमिका घेतली आहे. आमची भूमिका सहकार्याची आहे. आम्हाला यामध्ये राजकारण करायचेच नाही. हा कुठल्या पक्षाचा मुद्दा नाही.

अध्यक्ष महोदय, राज्यातील ओबीसींना पूर्णपणे वंचित ठेवण्याचे काम आज या निर्णयामुळे होत आहे. परंतु, राज्य सरकार गंभीर आहे काय की, कोणाच्या दबावाखाली तुम्ही आहात? माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ मला हे समजत नाही की, कोणाचा दबाव तुमच्यावर आहे का की, सर्व निवडणुका ओबीसींशिवाय झाल्या पाहिजेत, हा दबाव आहे का, हे लक्षात येत नाही. ... (अडथळा)... बरोबर आहे आपण टोपी घातली आहे. परंतु, हे आपल्याला "टोपी" घालत आहेत, एवढे लक्षात ठेवा. ती "टोपी" घालू नका. तुमचे आमचे राजकीय मतभेद असतील. परंतु, या विषयामध्ये आम्ही तुमच्या पाठीशी उभे राहण्यास तयार आहोत.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी सरकारला जाबही विचारलाच पाहिजे की, अशा प्रकारे माननीय सर्वोच्च न्यायालयाने .... आणि आपले नशिब की, माननीय सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम अहवालाची संधी दिली. माननीय सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, फायनल अहवाल नाही, अंतरिम अहवाल सादर करावा. तो अंतरिम अहवाल सादर करताना आम्ही जे काही केले आणि काल सरकारची माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये जी अवस्था झाली... आपली अक्षरश: लाजिरवाणी अवस्था झाली आहे.

अध्यक्ष महोदय, आमची मागणी आहे. पहिल्यांदा तर या राज्यातील एकही निवडणूक या पुढे ओबीसी आरक्षणाविना होता कामा नये. एकही निवडणूक अशी होता कामा नये. ५ जिल्हा परिषदा व १०५ नगर पंचायती यांच्या निवडणुका झाल्या. तुम्ही आम्हाला दरवेळेस सांगता. आमच्या समाधानाकरिता मंत्रिमंडळाचे ठराव घेऊ नका. मंत्रिमंडळाचे ठराव घेतले तर त्या ठरावाच्या पाठीशी उभे राहून कुठल्याही

श्री.देवेंद्र फडणवीस ...

पध्दतीने लढाई करायची हिंमत दाखवा. नाही तर इकडे दाखविण्याकरिता मंत्रिमंडळाचे ठराव करायचे व तिकडे निवडणुकीवर निवडणुका पार पडत आहेत. आता महाराष्ट्रातील २/३ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. या निवडणुका पार पडल्या तर, ओबीसींना कधीच आरक्षण मिळणार नाही. त्यामुळे तत्काळ प्रथम कायदा करावयाचा असेल तर, कायदा करावा.

अध्यक्ष महोदय, मध्य प्रदेशच्या केसमध्ये आपण पाहिले. खरे तर या कायद्याची मागणी आम्ही करणेही चुकीचे आहे तरीही मी मागणी करतो. मध्य प्रदेशमध्ये निवडणुका घेण्याचे सर्व अधिकार हे राज्य निवडणूक आयोगाला आहेत. परंतु, त्यांच्या तारखांच्या संदर्भातील काही अधिकार हे राज्य शासनाकडे आहेत. त्यामुळे तेथे असा प्रश्न तेथे निर्माण झाल्याबरोबर त्यांनी माननीय सर्वोच्च न्यायालयातून आपल्या कायद्याच्या भरवशावर सोडवणूक करुन घेतली आणि आता त्यांची कारवाई पूर्ण करुन ते लोक ओबीसी आरक्षणासहित पुढच्या काळात निवडणुका घेत आहेत. हे आम्हाला महाराष्ट्रात अपेक्षित आहे.

अध्यक्ष महोदय, तुम्ही १०५ नगर पंचायतींच्या निवडणुका घेतल्या आणि आता एवढ्या निवडणुका होणार असतील तर कुठे तरी अन्याय होत आहे. त्यामुळे आमची म.वि.स. नियम ५७ च्या माध्यमातून अशी मागणी आहे की, आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवा. ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात या सभागृहात चर्चा झाली पाहिजे. हे सभागृह एकत्रितपणे ओबीसींच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, राज्य सरकारचे असे कोण अधिकारी आहेत की, ज्यांना एवढे समजत नाही की, अहवालावर तारीख नमूद केली पाहिजे, अहवालामध्ये काय असावे, काय असू नये. जे अधिकारी इंडिपेंडट कमिशनला मुख्यमंत्री महोदयांच्या दारी उभे करुन मुख्यमंत्री महोदयांनाही माननीय सर्वोच्च न्यायालयात लाज आणतात ते कोण आहेत?

श्री.देवेंद्र फडणवीस ...

अध्यक्ष महोदय, मला एक समजत नाही. राज्य मागासवर्ग आयोगाचे गठन आपण एक तर उशिरा केले. ते उशिरा केल्यानंतर माझा कोणा व्यक्तीवर आक्षेप नाही. परंतु, त्यामध्ये कोण आहेत, त्यामध्ये आपण कोणाला घेतले आहे? राज्य मागासवर्ग आयोग ही कार्यकर्त्यांची सोय लावायची जागा नाही. त्या ठिकाणी तुम्ही तज्ज्ञ नेमले पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, आता तर माझे असे मत आहे की, माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये नेमके काय नमूद केले आहे ते आज आपल्याला पूर्ण समजेल. त्यांनी जर म्हटले असेल तर नवीन डेडिकेटेड कमिशन तयार करा. त्या डेडिकेटेड कमिशनच्या माध्यमातून २ महिन्यांमध्ये हे काम होऊ शकते. तोपर्यंत या सर्व निवडणुका वगैरे पुढे गेल्या पाहिजेत. तोपर्यंत कुठल्याही परिस्थितीमध्ये एकही निवडणूक ओबीसी आरक्षणाशिवाय होऊ नये.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस...

आजचे सभागृहासमोरील कामकाज बाजूला ठेवून इतर मागास वर्गाच्या आरक्षणासंदर्भात चर्चा करावी व मार्ग काढण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्ष नेता तथा माजी मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी माननीय सर्वोच्च न्यायालयाने इतर मागास वर्गाच्या आरक्षणासंदर्भात दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मत मांडले आहे व मागणी केली आहे. याकरिता मी त्यांचे स्वागत करतो. ते इतर मागास वर्गीयांच्या पाठीशी मजबुतीने उभे आहेत, ही माझ्या दृष्टीने आनंदाची गोष्ट आहे. विरोधी पक्षाच्या एक सन्माननीय सदस्या यांनी मला "ओबीसी वाचवा" असे वाक्य छापलेली टोपी मला डोक्यावर परिधान करण्यास दिली, ती मी ताबडतोब परिधान केली आहे.

अध्यक्ष महोदय, शासनाच्या वतीने इतर मागास वर्गीयांच्या आरक्षणाबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडण्यात आली आहे. अगोदरच्या एका सुनावणीमध्ये तामिळनाडू राज्याचे माननीय खासदार श्री.विल्सन यांच्या संदर्भातील उल्लेख माननीय न्यायालयाने केला आहे. तसेच संसदेने केलेली सुधारणा त्यांनी आमच्या निदर्शनास आणून दिली आहे. घटनेमध्ये करण्यात आलेल्या बदलानुसार इतर मागास वर्गीयांना राजकीय आरक्षण देण्याचा अधिकार मान्य करण्यात आला आहे. माननीय न्यायालयाने पुढे नमूद केले की, इतर मागासवर्गीयांचे आरक्षण नाकारण्यात आले नाही, त्यांना आरक्षण दिले पाहिजे, त्यासाठी सादर केलेल्या विदाची छाननी ते करु शकत नाही. "We may not be understood to have express any opinion either way in regard to the correctness of the information referred to in interim application. It is for the commission to examine the same and take appropriate view of the matter as may be advised.". तो मागास वर्ग आयोगाकडे सादर करावा व ते तपासतील. राज्यातील निवडणुका जवळ आल्या आहेत, असा शासनाच्या वतीने युक्तीवाद केल्यानंतर माननीय न्यायालयाने १५ दिवसांमध्ये अहवाल मागवून घेण्यास

श्री.छगन भुजबळ...

सांगितले. सदरहू कालावधीमध्ये इतर मागस वर्गाच्या आरक्षणासंदर्भात सरकारकडे ज्या गोष्टी होत्या त्या सादर करण्यात आल्या आहेत. आयोगाचे अध्यक्ष हे माननीय उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आहेत, त्यांनी या प्रकरणी विचार केला आहे. काही गोष्टींवर त्यांनी बोट ठेवले आहे.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाने चर्चा करण्याची मागणी केली आहे. मी या विषयाच्या संदर्भात विरोधी पक्षाशी नियमितपणे चर्चा करीत असतो. या प्रकरणी ते सहकार्य करतात. माननीय मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली काल मंत्रिमंडळाची बैठक झाली आहे. त्यामध्ये इतर मागास वर्गीयांच्या आरक्षणाशिवाय निवडणुका घ्यावयाच्या नाहीत, असा निर्णय घेतला आहे. या निर्णयास विरोधी पक्षाचा पाठिंबा मिळाला आहे, ही बाब इतर मागास वर्गीयांच्या दृष्टीने चांगली आहे. अशा पध्दतीचे चांगले चित्र राज्यात उभे राहत आहे. या विषयाच्या संदर्भात चिखलफेक करुन काही होणार नाही. शासनाने १५ दिवसांमध्ये आरक्षण का मिळवून दिले नाही, असा प्रश्न विरोधी पक्षाने उपस्थित केला तर आम्ही विरोधी पक्षाने त्यांच्या मागील ५ वर्षांच्या सत्ता कालावधीत आरक्षण का मिळवून दिले नाही, इम्पेरिकल डाटा का दिला नाही, श्री.विकास गवई कोण आहेत, ते कोणामुळे उभे राहत आहेत, मोठे वकील कोठून येत आहेत, असे प्रश्न उपस्थित करु शकतो. महाराष्ट्रासह मध्य प्रदेश व कर्नाटक राज्यातील इतर मागास वर्गीयांचे आरक्षण अडचणीत आले आहे. आपण एकमेकांवर चिखलफेक करुन चालणार नाही, या विषयाच्या संदर्भात मार्ग काढावयाचा असेल तर एकमेकांना विश्वासात घेऊन मार्ग काढला पाहिजे.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.छगन भुजबळ.......

मध्य प्रदेश राज्यातील ओबीसी आरक्षणासंदर्भात मी देखील आपल्यासोबत चर्चा केलेली आहे. उक्त चर्चेनुसार या राज्यातील ओबीसी आरक्षणामध्ये मार्ग निघत नसेल तर आपण वेगळ्या पद्धतीने मार्ग काढण्याचा प्रयत्न करु. या सर्व बाबींना आमचा विरोध नाही. त्यामुळे येथे एकमेकांची उणी-दुणी काढण्यापेक्षा एकत्र बसून मार्ग काढण्याचा प्रयत्न करु. आपल्या राजकारणाचे अन्य विषय सुरुच राहतील. ओबीसी आरक्षणासंदर्भात आपण एकमताने निर्णय घेऊ शकलो तर राज्यामध्ये एक चांगला संदेश जाईल, असे मला वाटते. आता विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्य "ओबीसी वाचवा" नावाच्या टोप्या घालून बसले आहेत. आपण सर्व ओबीसी बांधव आहात. आपण ओबीसी वाचवा असे म्हणत आहात. मी देखील ओबीसी वाचवा असेच म्हणत आहे.

अध्यक्ष महोदय, ओबीसीचे आरक्षण वाचले पाहिजे, याबाबत दोन्ही बाजूचे एकमत आहे. त्यामुळे आमचे सरकार ओबीसी आरक्षणावर ठाम आहे. आमचे सरकार ओबीसी आरक्षण मिळवून देणार आहोत आणि त्या अनुषंगाने आम्ही यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न देखील करीत आहोत. माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये ओबीसी आरक्षणासंदर्भात काय चर्चा झाली, याबाबतची सर्व माहिती आम्ही घेत आहोत. आमचे सरकार वकिलांसोबत चर्चा करीत आहे. कोणत्या बाबी राहून गेल्या, याची देखील माहिती घेत आहेत. घाईघाईत १५ दिवसांमध्ये अहवाल सादर केल्यामुळे त्यामध्ये काही बाबी राहून गेल्या असतील. परंतु त्या सर्व बाबींची पुर्तता करता येईल किंवा त्या बाबीमध्ये सुधारणा करता येतील. जेथे निवडणुका overdue झालेल्या आहेत, त्याच ठिकाणच्या निवडणुका घेण्यात याव्यात असे, माननीय सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. ज्या ठिकाणच्या निवडणुका overdue झालेल्या नाहीत त्या ठिकाणच्या निवडणुकीबाबत माननीय सर्वोच्च न्यायालय silent आहे. कारण एकही जिल्हा परिषद overdue झालेली नाही. काही नगरपालिका overdue झालेल्या आहेत. त्यामुळे ज्या ठिकाणी निवडणुका overdue झालेल्या आहेत, त्याच ठिकाणी निवडणुका घेण्याबाबत

असुधारित प्रत

श्री.छगन भुजबळ.......

माननीय सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. त्यामुळे यातून आपणास लवकरात लवकर मार्ग काढावा लागेल. आरक्षणासंदर्भात माननीय विरोधी पक्षनेते यांचा चांगला अभ्यास आहे. त्यामुळे माननीय विरोधी पक्षनेते व सत्ताधारी पक्षातील तीन-चार अभ्यासू सन्माननीय सदस्यांनी एकत्र बसून यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सभागृहामध्ये फक्त चर्चा होईल. कोणकोणावर टीका केली हे उद्या वर्तमानपत्रामध्ये छापून येईल. चुका आमच्याकडून होतात तशाच त्या तुमच्याकडून देखील होतात. मागील पाच वर्षामध्ये आपण आयोग स्थापन करु शकला नाहीत तर आम्ही १५ दिवसांमध्ये अहवाल कसा सादर करणार, अशा विषयांवर चर्चा करुन काहीही अर्थ नाही. घाईघाईमध्ये अहवाल सादर केल्यामुळे काही तांत्रिकबाबी राहून गेलेल्या आहेत आणि ते आम्ही मान्य देखील केलेले आहे. आम्ही माननीय सर्वोच्च न्यायालयाचा आदर करतो. ओबीसी आरक्षणावर दोन्ही बाजुने चिखलफेक न करता आपण एकत्र बसून यावर मार्ग काढला पाहिजे. सभागृहामध्ये एकमेकांवर चिखलफेक न करता ओबीसी आरक्षणावर मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहोत, असे ओबीसी समाजाला आश्वासित करणे आवश्यक आहे. ओबीसी आरक्षणाबाबत या राज्यातील सर्व पक्षाचे नेते एकत्र काम करीत असल्याचे चित्र राज्यालाच नव्हेतर देशाला देखील दाखवून देऊ. आपण असे चित्र देशासमोर का उभे करु शकत नाही? आपल्यासारखा समजदार नेता या राज्याला विरोधी पक्षनेता म्हणून लाभला असताना ओबीसी आरक्षणामध्ये काय अडचण येणार आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्षनेते व काही अभ्यासू सन्माननीय सदस्य एकत्र बसून यावर मार्ग काढण्याचा प्रयत्न करावा, अशी मी मंत्री म्हणून नव्हेतर एक ओबीसीचा कार्यकर्ता म्हणून आपणास विनंती करीत आहे. एकमेकांमध्ये दुरी निर्माण करण्याऐवजी, भांडणे करण्याऐवजी, ऐकमेकांवर दोषारोप करण्याऐवजी आपण सर्वांनी एकत्र येऊन ओबीसी समाजाला न्याय देण्यासाठी पुढे यावे, अशी मी विनंती करतो. ओबीसी आरक्षणावर बोलण्यासाठी खूप विषय आहेत, अनेक कायदे आहेत, अनेक निकाल आहेत, आरक्षणाबाबत कोण काय बोलले, कोण कोठे चुकले, या सर्व बाबींची माहिती आमच्याकडे आहे. परंतु यावर चर्चा करुन काहीही साध्य होणार

श्री.छगन भुजबळ.......

नाही. या विषयावरील चर्चेला काहीही अर्थ नाही. त्यामुळे यावर चर्चा न करता आपणास ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सोडवावयाचा आहे. आपण सर्वांनी एकत्र बसून यावर शांततेने मार्ग काढण्यासाठी कायदेशीर सल्ल्यानुसार पुढे जाणे आवश्यक आहे. याबाबत या सरकारची तयारी आहे. ओबीसी आरक्षणाबाबत दुरावा निर्माण करण्याचा प्रयत्न करु नका. कारण आपण काही तरी बोलणार आणि त्यावर आम्ही काही तरी बोलणार. असे झाले तर आपल्या "ओबीसी वाचवा" या शब्दाऐवजी "ओबीसी बुडवा" असे म्हणावे लागेल. खरोखर ओबीसी आरक्षण टिकविण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करु, अशी मी विनंती करतो.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी अनेक बाबींची मांडणी केलेली आहे. परंतु आमचे अद्याप समाधान झालेले नाही. आम्ही सरकारसोबतच आहोत. आपण जेव्हा जेव्हा बैठकीला पाचारण केले तेव्हा तेव्हा आम्ही त्यास मान्यता दिलेली आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

श्री. देवेंद्र फडणवीस....

आम्ही कधीही विरोध केलेला नाही. माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ यांनी सांगितल्यानुसार आम्ही मदत केलेली आहे. परंतु होत काही नाही. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, इंटेन्शन काय आहेत, यापेक्षा होतय काय, हे महत्त्वाचे आहे. आपण सांगितले की, एक व्यक्ती म्हणून माझे समर्थन आहे. परंतु माझा प्रश्न असा आहे की, मंत्री म्हणून आपणास समर्थन आहे काय ? आरक्षण देण्याच्या दृष्टीने कार्यवाही होत आहे काय, तसे घडत आहे काय ? मंत्री महोदय सांगत आहेत, तसे नाही. त्यांनी ५ वर्षे, ७ वर्षांचा उल्लेख केला आहे. तसे पहावयास गेले तर ओबीसी समाजाच्या आरक्षणाबाबत सन २०१० मध्ये निकाल आला आहे. सन २०१० ते सन २०१४ पर्यंत युपीए सरकार म्हणजेच माननीय श्री. छगन भुजबळ यांचे सरकार सत्तेमध्ये होते. त्यावेळेस आमचे सरकार सत्तेमध्ये नव्हते. त्यावेळेस ओबीसी समाजाच्या आरक्षणाबाबत कोणीही कार्यवाही केली नाही. या निकालाचे पालन का झाले नाही, हे केव्हा विचारले ? मी सांगू इच्छितो की, दिनांक १३/१२/२०१९ रोजी याबाबत विचारणा केली होती. त्यामुळे हे सरकार यासंदर्भात आमच्याकडे बोट दाखवू शकत नाही. माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ हे अतिशय हुशार आहेत. त्यांनी या आरक्षणाबाबत आपण सर्वांनी एकत्रित राहावे, हे सांगत आमच्यावर दोन टोमणेही मारले आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी असे करु नये. दिनांक १३/१२/२०१९ नंतर ओबीसी समाजाच्या आरक्षणाची जबाबदारी सरकार म्हणून आपणास स्वीकारावी लागेल. ओबीसी समाजाच्या आरक्षणाबाबत कालची अवस्था आपण सर्वांनी पाहिली आहे. त्यामुळे आम्ही ओबीसी समाजाच्या आरक्षणासाठी या सभागृहात चर्चा करु नये, तर ती कोठे करावी ? ओबीसी समाजाच्या आरक्षणावर आज निर्णय झाला पाहिजे. ओबीसी समाजाच्या आरक्षणाबाबत आम्हाला वारंवार आश्वासने दिली जात आहेत. परंतु कार्यवाही मात्र होत नाही. त्यामुळे आमचे असे म्हणणे आहे की, आजचे कामकाज थांबवून ओबीसी समाजाच्या आरक्षणावर चर्चा करावी.

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

श्री. छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी जे सांगितले आहे, त्याबाबत मी बोलू इच्छितो. सन २०१० मध्ये ओबीसी समाजाच्या आरक्षणाचा निकाल लागल्यानंतर आम्ही लोकसभेमध्ये याची मागणी केली होती. इम्पेरिकल डाटा गोळा करण्यासाठी यंत्रणा निर्माण केली होती. सन २०१६ मध्ये इम्पेरिकल डाटा माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्याकडे आला. आम्ही सन २०१० नंतरही ओबीसी समाजाच्या आरक्षणाकरिता पाठपुरावा केला आहे. ओबीसी समाजाच्या आरक्षणाबाबत सन २०१० नंतर आम्ही शांत बसलेलो नव्हतो. सन २०१० नंतर आमच्या सरकारने इम्पेरिकल डाटा गोळा करुन तो केंद्र शासनाकडे सुपूर्द केला होता. सन २०१६ नंतर त्यावर माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या सरकारने कोणतीही कार्यवाही केली नाही. ज्यावेळेस हे प्रकरण माननीय न्यायालयात गेले, तेव्हा माननीय श्री. देवेंद्र फडणवीस हे राज्यात मुख्यमंत्री होते. मुख्यमंत्री असताना तुम्ही देखील त्यावर कोणताही निर्णय घेऊन कार्यवाही केली नाही. असे असताना आता तुम्ही आम्हाला १५ दिवसांमध्ये निर्णय घेण्यासाठी सांगत आहात. हे चुकीचे आहे. यामागे केवळ त्यांचे राजकारण आहे. ओबीसी समाजाला आरक्षण मिळण्यासंदर्भात मी सातत्याने आपल्याकडे विचारणा करीत असतो. मी याबाबत नेहमी आपणास विश्वासात घेत असतो. परंतु आता आपण त्याचे राजकारण करीत आहात. हे अतिशय चुकीचे आहे. मागील सरकारने ओबीसी समाजाकरिता इम्पेरिकल डाटा दिलेला नाही. मागील सरकारने त्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही. हा डाटा युपीए सरकारने तयार केला होता. हा डाटा त्यांच्याकडे आहे. तो डाटा दिलेला नाही. मागील पाच वर्षाच्या काळात त्यांच्या सरकारने कोणतीही कार्यवाही केली नाही. मागील सरकारने मागच्या पाच वर्षापासून हे प्रकरण प्रलंबित ठेवले आहे. त्यावर कोणतेही उत्तर मागील सरकारने दिलेले नाही. सन २०१९ च्या निवडणुकीच्यावेळेस घाईघाईने इम्पेरिकल डाटा मागितला होता. त्यामुळे हे आरक्षण लवकर न मिळण्याची जबाबदारी माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांची आणि सन्माननीय विरोधी पक्षनेते यांची आहे.

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**उपाध्यक्ष :** प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यासंदर्भात आज एकूण तीन सूचना प्राप्त झाल्या असून त्या म.वि.स. नियम ५७ च्या निकषात बसत नसल्यामुळे सदरहू सूचनेस मी अनुमती नाकारत आहे. आता प्रश्नोत्तरे घेण्यात येतील.

------

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**पृ.शी./मु.शी. :** तोंडी उत्तरे

**गडचिरोली जिल्ह्यात धान खरेदीला मुदतवाढ देण्याबाबत**

**(१) * ४०२०८ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात पणन हंगाम सन २०२१-२०२२ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरीप हंगामातील धान खरेदी सुरु असून शासन निर्णयानुसार धान खरेदीला दिनांक ३० जानेवारी, २०२२ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन तांत्रिक अडचणी, गोदामे पुर्ण क्षमतेने भरलेली असणे तसेच गोदामातील धान भरडाईसाठी परवानगी देण्यात न आल्याने धान खरेदीची प्रक्रिया मंदावली असून शेतकऱ्यांकडे मोठया प्रमाणात धान विक्रीसाठी शिल्लक असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ रोजीच्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पणन हंगाम सन २०२१-२०२२ मधील किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरीप हंगामातील धान खरेदीला मुदतवाढ देण्याकरीता आरमोरी विधानसभा सदस्य यांनी दिनांक ०८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास दिलेल्या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय,दि.३०/०९/२०२१ अन्वये खरीप पणन हंगाम २०२१-२२ साठी दि.०१/१०/२०२१ ते दि.३१/०१/२०२२ असा खरेदी कालावधी निश्चित करण्यात आला होता.

(२) अंशत: खरे आहे.

ता.प्र.क्र. ४०२०८.....

श्री. छगन भुजबळ....

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

तथापि, मागील हंगामाच्या तुलनेत खरीप पणन हंगाम २०२१-२२ मध्ये दि.३१/०१/२०२२ अखेर गडचिरोली जिल्ह्यात १७,३६,९८३.७७ क्विंटल इतकी धान खरेदी झाली आहे.

(३) अभिकर्ता संस्थांच्या मागणीनुसार प्रथम दि.०८/०२/२०२२ पर्यंत धान खरेदीस मुदतवाढ देण्यात आली. तद्नंतर मार्केटिंग फेडरेशनच्या मागणीनुसार दि.१४/०२/२०२२ पर्यंत आणि आदिवासी विकास महामंडळाच्या मागणीनुसार दि.१८/०२/२०२२ पर्यंत धान खरेदीस मुदतवाढ देण्यात आली. तद्नंतर अभिकर्ता संस्थांकडून मुदतवाढीची मागणी नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : अध्यक्ष महोदय, धान खरेदीला दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, अशी माझी यानिमित्ताने मागणी आहे.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

**ता.प्र.क्र.४०२०८.....**

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, खरेदी करणाऱ्या अभिकर्ता संस्थांच्या मागणीनुसार प्रथम दिनांक ०८ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत धान खरेदीस मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर मार्केटिंग फेडरेशनच्या मागणीनुसार दिनांक १४ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत आणि आदिवासी विकास महामंडळाच्या मागणीनुसार दिनांक १८ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत धान खरेदीस मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर अभिकर्ता संस्थांकडून मुदतवाढीची मागणी करण्यात आलेली नाही.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : अध्यक्ष महोदय, गडचिरोली जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात धानाची खरेदी केली जाते. सदर खरेदीस दिनांक ३१ मार्च रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी अशी मी पुन्हा विनंती करीत आहे.

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांच्या मागणीच्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, ज्या शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे परंतु अद्याप त्यांच्या धानाची खरेदी करण्यात आलेली नाही अशा शेतकऱ्यांनी पुढे येऊन मागणी केली तर याबाबत निश्चितपणे विचार करण्यात येईल.

**उपाध्यक्ष :** ठीक आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक २० मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक सकाळी ११.२६ ते ११.४६ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. दीपक चव्हाण)**

**तालिका सभाध्यक्ष :** सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य हौदात येऊन घोषणा देतात व फलक फडकतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी ११.४७ ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देतात व फलक फडकवितात.)

**उपाध्यक्ष** : प्रश्नोत्तराचा तास आता संपलेला आहे.

-------

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देतात व फलक फडकवितात.)

**पृ.शी./मु.शी. :** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

ॲड. अनिल परब (संसदीय कार्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचा त्रेचाळीसावा वार्षिक एकत्रित अहवाल स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

------

श्रीमती आदिती तटकरे (उद्योग राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा ५३ वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**उपाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलबध करुन देण्यात येईल.

-------

ॲड. अनिल परब ( परिवहन मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.२१६९९/२०२१ महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ विरुध्द संघर्ष एस.टी. कामगार संघटना आणि इतर या याचिकेतील मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार शासन निर्णय दि.८.११.२०२१ नुसार मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीचा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

-------

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देतात व फलक फडकवितात.)

**पृ.शी./मु.शी**. : स्थगन प्रस्तावाच्या सूचना

**उपाध्यक्ष** : आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

-----

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देतात व फलक फडकवितात.)

## लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याबाबत

**उपाध्यक्ष :** आजच्या कामकाज पत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या सर्व लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहेत.

------

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देतात व फलक फडकवितात.)

**पृ.शी.** : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

**मु.शी.** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

**उपाध्यक्ष** : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चा आज शुक्रवार, दिनांक ४ मार्च व शनिवार, दिनांक ५ मार्च, २०२२ रोजी घेण्यात येणार आहे. सदर दोन्ही दिवसांचे कामकाज लक्षात घेता चर्चेसाठी सर्वसाधारणपणे अनुक्रमे ०२.०० तास व ०२.३० तास याप्रमाणे अंदाजे ०४.३० तास चर्चेकरिता उपलब्ध आहेत. त्यामधून माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तराकरिता ०१.०० तास वगळता ०३.३० तासांचा वेळ सन्माननीय सदस्यांना भाषणाकरिता उपलब्ध राहील. प्रस्तावकांना १५ मिनिटे देण्यात येतील व प्रस्तावाला पाठिंबा देणारे अनुमोदक यांना १० मिनिटे देण्यात येतील. ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चेत भाग घ्यावयाचा आहे त्यांनी आपली नावे आपल्या पक्षाच्या प्रतोदांमार्फत माझ्याकडे १० मिनिटांत पाठवावीत. नावे प्राप्त झाल्यानंतर भाषणावर वेळेचे बंधन घालावे काय, याचा विचार करता येईल.

या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सन्माननीय सदस्यांकडून काही सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत. सुधारणांची एकत्रित यादी माननीय सदस्यांना वितरित केलेली आहे.

प्रस्तावक सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू हे चर्चेस सुरुवात करतील व तद्नंतर अनुमोदक सन्माननीय सदस्य श्री. अनिल पाटील व सन्माननीय सदस्य श्री. अमित झनक हे आणि माननीय विरोधी पक्ष नेते व इतर सन्माननीय सदस्य अशा क्रमाने चर्चा होईल. आता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला सुरुवात होईल. सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर जाऊन बसावे.

आता सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

यानंतर श्रीमती करंदीकर.....

असुधारित प्रत

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देतात व कापडी फलक फडकवितात )

श्री. रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व ) : अध्यक्ष महोदय, माननीय राज्यपाल यांच्या अभिभाषणाच्या संदर्भात माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, काल माननीय राज्यपाल यांचे सदनामध्ये अभिभाषण झाले. सभागृहातील प्रथा व परंपरेनुसार माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाकरिता सदनातील दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य उपस्थित असतात. राज्यपाल महोदयांचे अभिभाषण दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांना संबोधित केलेले असते. या अभिभाषणामध्ये राज्याच्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात निदेश दिलेले असतात. या आर्थिक वर्षामध्ये राज्यात कशा प्रकारे काम केले जाणार आहे, कोणत्या योजना राबवल्या जाणार आहेत, यासंबंधी दिशानिर्देशन या अभिभाषणामध्ये केलेले असते.

अध्यक्ष महोदय, माननीय राज्यपाल यांनी आपल्या अभिभाषणास सुरुवात केल्या नंतर विरोधी पक्षाच्या बाजूने गोंधळ घालण्यात आला. त्या वेळी माननीय राज्यपाल यांनी अभिभाषणास सुरुवात केली. त्यांचे शेवटचे वाक्य अत्यंत खेदजनक होते, मनाला लागणारे होते. या पूर्वी देखील अनेक राज्यपाल महोदयांची भाषणे मध्यवर्ती सभागृहात झालेली आहेत. माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार राज्य शासन काम करीत असते. माननीय राज्यपाल यांनी आपल्या अभिभाषणातील पहिले वाक्य वाचले व त्या नंतर शेवटचे वाक्य वाचले. या नंतर ते आपले अभिभाषण संपवून सदनाच्या बाहेर निघून गेले. ते सदनाच्या बाहेर जात असतानाच राष्ट्रगीताची धून वाजवण्यात आली. राष्ट्रगीताची धून वाजत असताना सभागृहामध्ये माननीय राज्यपालांचे असणे प्रामुख्याने महत्त्वाचे होते. याचीच शिकवण आम्हाला मिळालेली आहे. मी सदनामध्ये ३ टर्म काम केलेले असल्यामुळे आम्हाला त्यांच्याकडून हे अपेक्षित होते. महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल श्री. भगत सिंह कोश्यारी यांच्या अभिभाषणाची पुस्तिका आम्हाला मिळाली. त्या अनुषंगाने मी या ठिकाणी माझे विचार व्यक्त करणार आहे.

श्री. रविंद्र वायकर......

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र शासनाच्या वतीने मराठी भाषिक जनतेच्या संबंधी अभिभाषणामध्ये तिसऱ्या क्रमांकावर मुद्दा दिलेला आहे. मराठी भाषिक जनतेवर सातत्याने अन्याय होत आहे, त्याचा मी निषेध करतो. महाराष्ट्र – कर्नाटक सीमा वाद गेल्या ७० वर्षांपासून धगधगत राहिलेला आहे. सीमा भागातील मराठी जनता तेथे अनेक वर्षांपासून राहत असून त्यांच्यावर अनेकदा हल्ले होत आहेत. या संदर्भात पूर्वी देखील सदनातून एकमताने पाठिंबा दिलेला आहे. महाराष्ट्रातील मराठी जनता तेथे राहत असून त्यांच्यावर अनेकदा हल्ले होत आहेत. त्याचा मी निषेध करतो. या सदनाने देखील त्याचा निषेध केलेला आहे.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देतात व फलक फडकावतात )

यानंतर श्रीमती गिरप.....

असुधारित प्रत

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकत्रितपणे घोषणा देऊन फलक फडकवितच असतात. )

श्री.रविंद्र वायकर ...

छत्रपती शिवाजी महाराजांचा केंद्र शासनाच्या माध्यमातून व आपल्या माध्यमातून ...(अडथळा)... आपण नेहमीच छत्रपती शिवाजी महाराजांना आपले दैवत मानतो. या दैवताबाबत जर अशा पध्दतीने दुटप्पी भूमिका घेतली जाणार असेल तर ते अन्यायकारक आहे. ज्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावावर केंद्र शासन मतदानाच्या वेळेस मराठी बांधवांकडे मतांचा जोगवा मागते. त्याच मराठी बांधवांच्या व्यथांबाबत सत्तेमध्ये आल्यानंतर केंद्र शासन जर अशा पध्दतीने दुटप्पी भूमिका घेणार असेल तर त्याचा देखील निषेध या सभागृहाच्या माध्यमातून झाला पाहिजे, केला पाहिजे. ...(अडथळा)...

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, यापुढे मराठी बांधवांवर अन्याय होऊ नये यासाठी देखील आपल्याला या सभागृहाच्या माध्यमातून केंद्र शासनाला खंबीरपणे कळविले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, दिनांक १६ डिसेंबर, २०२१ रोजी बंगळुरूमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या विटंबनेचे व बेळगावातील महाराष्ट्र एकीकरण समितीच्या अध्यक्षांवर शाई फेकल्याचे कृत्य अत्यंत निंदनीय होते. मी त्याची निंदा करतो आणि त्याचा निषेध करतो.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी भाषिक जनतेवर कर्नाटक सरकारकडून सातत्याने होणारे अन्याय, यातून मराठी अस्मिता डळमळीत करण्याचा आटोकाट प्रयत्न केला जात आहे, याचा देखील मी निषेध करतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वास्तव्याने पावन झालेल्या या राज्यात कर्नाटक सरकारची ... (अडथळा)...

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकत्रितपणे घोषणा देऊन फलक फडकवितच असतात. )

श्री.रविंद्र वायकर ...

अध्यक्ष महोदय, खरे तर राज्यपाल महोदयांच्या संपूर्ण अभिभाषणावर मला बोलावयाचे होते. परंतु, अशा पध्दतीचा गोंधळ घालून या सभागृहाची शिस्त बिघडणे हे अत्यंत दुर्दैवी आहे आणि म्हणून मी माझे भाषण आटोपते घेतो.

...........

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, ...

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले आपले काय म्हणणे आहे?

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, या सभागृहामध्ये जे काही कामकाज चाललेले आहे ते महाराष्ट्राला, महाराष्ट्र विधानसभेच्या परंपरेला शोभेनासे आहे.

............

असुधारित प्रत

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकत्रितपणे घोषणा देऊन फलक फडकवितच असतात. )

**पृ. शी. :** दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO. I OF 2022**

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA SHOPS AND ESTABLISHMENTS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITIONS OF SERVICE) ACT, 2017.)

श्री.हसन मुश्रीफ ( कामगार मंत्री ) : अध्यक्ष महोदय, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १ – महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यामध्ये सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्याकरिता मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपाध्यक्ष** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १ मांडतो.

**उपाध्यक्ष** : विधेयक मांडण्यात आले आहे.

............

यानंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकत्रितपणे घोषणा देऊन फलक फडकवितच असतात. )

**अशासकीय कामकाज – विधेयके**

**उपाध्यक्ष :** आजच्या कामकाज पत्रिकेत अनुक्रमांक-सात मध्ये 'पुर:स्थापनार्थ' या शीर्षकांतर्गत दर्शविण्यात आलेली अनुक्रमांक १ ते ४ वरील अशासकीय विधेयके संबंधित सन्माननीय सदस्यांनी अनुक्रमे मांडावीत.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकत्रितपणे घोषणा देऊन फलक फडकवितच असतात. )

**उपाध्यक्ष** : मी संबंधित सन्माननीय सदस्यांना पुन:श्च विनंती करतो की, त्यांच्या नावांतर्गत दर्शविण्यात आलेली अशासकीय विधेयके अनुक्रमे मांडावीत.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकत्रितपणे घोषणा देऊन फलक फडकवितच असतात. )

(अशासकीय विधेयके मांडण्यात आली नाहीत.)

----------

असुधारित प्रत

**अशासकीय कामकाज – ठराव**

**उपाध्यक्ष :** आजच्या कामकाज पत्रिकेत अनुक्रमांक-आठ मध्ये "अशासकीय ठराव" या शीर्षकांतर्गत दर्शविण्यात आलेले अनुक्रमांक १ ते ६ वरील अशासकीय ठराव सन्माननीय सदस्य सर्वश्री गणेश नाईक, सुनिल प्रभू, राणाजगजितसिंह पाटील, समीर मेघे, सुरेश भोळे, सुनिल प्रभू यांचे आहेत, त्यांनी ते अनुक्रमे मांडावेत.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकत्रितपणे घोषणा देऊन फलक फडकवितच असतात. )

**उपाध्यक्ष :** मी संबंधित सन्माननीय सदस्यांना पुन:श्च विनंती करतो की, त्यांच्या नावांतर्गत दर्शविण्यात आलेले अशासकीय ठराव अनुक्रमे मांडावेत.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकत्रितपणे घोषणा देऊन फलक फडकवितच असतात. )

(अशासकीय ठराव मांडण्यात आले नाहीत.)

----------

असुधारित प्रत

**उपाध्यक्ष :** सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. मी आता सभागृहाची बैठक दिवसभरासाठी स्थगित करीत आहे. सभागृहाची नियमित बैठक सोमवार, दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १७ मिनिटांनी सोमवार, दिनांक ७ मार्च, २०२२ रोजीच्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

असुधारित प्रत